सहकारी गृहनिर्माण संस्थाना जमीन
देण्याच्या संबंधातील धोरण.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन पूरकपत्र क्र.एलसीएस-१०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १० फेब्रुवारी,२००१

वाचा:- शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एलसीएस-१०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दिनांक ९.७.१९९९

पूरकपत्र:-

शासन निर्णय क्र.एलसीएस-१०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दिनांक ९.७.१९९९ सोबतच्या जोडपत्र "अ" मध्ये अर्हता क्र.८ पुढे खालील अर्हता क्र.९ चा समावेश करण्यात यावा:-

९. दि.१.१.२००२ नंतर ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना दोनपेक्षा अधिक अपत्ये असतील असे सभासद शासकीय गृहनिर्माण संस्थांना, शासकीय जमीन मंजूर करण्याच्या प्रकरणात सभासद म्हणून राहण्यास अपात्र ठरतील.

संस्थेचे आजीव सभासदांनाही ही अट लागू राहील.

२. हे शासन पूरकपत्र वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७४८४/व्यय-९, दि. ३०/१२/२००० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(स.शो.पडवेकर)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
प्रधान मुख्य वनसंरक्षक,महाराष्ट्र राज्य नागपूर,
संचालक सामाजिक वनीकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे.
जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमि अभिलेख ,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व जिल्हाधिकारी/सर्व उपविभागीय अधिकारी,
सर्व जिल्हा निरीक्षक,भूमि अभिलेख,
संचालक नगर रचना,,महाराष्ट्र राज्य,पुणे/ आयुक्त सहकार व निबंधक सहकारी संस्था,पुणे.
विभागीय उपसंचालक नगर रचना आणि सर्व सहाय्यक संचालक नगर रचना,
महालेखापाल,महाराष्ट्र राज्य(१),मुंबई/महालेखापाल,महाराष्ट्र राज्य(२),नागपूर.
वित्त विभाग-व्यय-९, मंत्रालय मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग,मुंबई.
मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक/राज्यमंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक,
प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक,
प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक,
महसूल व वन विभागातील सर्व सहसचिव/ उपसचिव व नियंत्रण अधिकारी,
महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
कार्यासन ज-१,महसूल व वन विभाग,(निवडनस्ती).